# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नल, जुना आग्रा रोड, नाशिक-४२२ ००२ )

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ/नाशिक/तक्रार क्रमांक - ४३३/२०१८/नंदुरबार**

१. श्री. मोहन यमाजी सानप, - अपिलार्थी
रा. ८७/१, सुभाषनगर, वंजारी गल्ली,
जुने धुळे, ता.जि.धुळे. ०१.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा - प्रतिवादी
तंत्र अधिकारी,
उपविभागीय कृषि अधिकारी
शहादा यांचे कार्यालय, शहादा,
ता. शहादा, जि.नंदुरबार.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
उपविभागीय कृषि अधिकारी
शहादा यांचे कार्यालय, शहादा,
ता. शहादा, जि.नंदुरबार.

**सुनावणी दिनांक - ०६/०८/२०१९**

तक्रारदार यांनी दिनांक २४/०९/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ०६/०८/२०१९ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २४/०९/२०१८ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २१/०६/२०१६ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ४४८०/२०१६/नंदुरबार च्या संदर्भात दिनांक २६/०७/२०१८ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २१/०६/२०१६ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी." तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. सबब, संबंधितांवर कारवाई होऊन तक्रारदार यांना माहिती मिळण्याची विनंती सदर तक्रार अर्जान्वये करण्यात आलेली आहे.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक ४४८०/२०१६/नंदुरबार च्या संदर्भात दिनांक २६/०७/२०१८ रोजी झालेल्या आदेशानुसार तक्रारदार यांना अर्जानुसार मागणी केलेली माहिती तयार असून घेऊन जाण्याबाबत कळविले. मात्र तक्रारदार यांनी सदर माहिती हस्ते पोच करण्याबाबत सांगितले. त्याअनुषंगाने कार्यालयाच्या खास दुतामार्फत मागणी केलेली माहिती देणकामी गेले असता, तक्रारदार यांनी ती माहिती न स्विकारता माहिती रजिष्टर पोस्टाने पाठवावी, असे सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांना दिनांक २४/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयातील उपलब्ध माहितीच्या एकूण १ ते ४११ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने पुरविली. तशी तक्रादार यांनी माहिती पुरविल्याचे नोंदणीकृत पोचदेय डाकेची पोच आयोगास सादर करीत आहोत.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील ४४८०/२०१६/नंदुरबार च्या संदर्भात दिनांक २६/०७/२०१८ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना आयोगाच्या आदेशानुसार कार्यालयातील उपलबध माहिती पुरविल्याचे दिसून येते. म्हणून प्रस्तुत तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

तक्रार क्रमांक ४३३/२०१८/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

(के. एल. बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक